# नियमित दिवाणी मुकदमा क्रमांक ६२५/२०२० मधील
# निशाण ३८ वरील आदेश

**१.** अर्ज व म्हणणे वाचले.

**२.** अभिलेखातील कागदपत्रे पाहिली.

**३.** उभयपक्षकारांचा युक्तिवाद ऐकला.

**४.** वादी यांचे अर्जातील कथनांप्रमाणे वादी क्र.२ ज्ञानदेव विष्णू कोळी हे दि.०९/०६/२०२१ रोजी मयत झाले आहेत. परंतु, वादी क्र.१ हे वयस्कर व अल्पशिक्षीत असलेने व वादी मयत झालेनंतर त्यांचे वारस रेकॉर्डवर आणावे लागतात, या कायदेशीर प्रक्रियेची त्यांना माहीती नसलेने त्यांचेकडून वादी क्र.२ यांचे वारस अभिलेखावर घेणेस विलंब झाला आहे. निशाण ४६ वरील मृत्यूप्रमाणपत्राचे अवलोकन केले असता वादी क्र.२ ज्ञानदेव विष्णू कोळी हे दि.०९/०६/२०२१ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. प्रतिवादी यांनी या अर्जास हरकत घेतली आहे. परंतु, वादी क्र.१ यांनी अर्जाचे पुष्ट्यर्थ प्रतिज्ञापत्र सादर करुन अर्जातील कथने शपथेवर कथन केली आहेत. कायद्याचे ज्ञान प्रत्येक नागरिकाला असते, असे गृहीतक असले तरी दिवाणी प्रक्रिया संहितेतील प्रक्रियेची प्रत्येक पक्षकारास माहीती असते, असे म्हणता येणार नाही. त्यामुळे, वादी यांनी त्यांचे अर्जास दिलेले कारण संयुक्तिक वाटते. वादी यांनी हा दावा निरंतर ताकिद होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे. त्यामुळे, दाव्याचे स्वरुप पाहता वादी क्र.२ यांचे वारसांना दाव्याचे कारण पुढे चालू राहते. त्यामुळे, या कामी वादी क्र.२ यांचे वारस अभिलेखावर घेणेसाठी झालेला विलंब माफ होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक व जरुरीचे आहे. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

१. वादी यांचा निशाण ३८ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. वादी यांचेकडून मयत वादी क्र.२ यांचे वारस अभिलेखावर घेणेसाठी झालेला विलंब माफ करणेत येत आहे.

-

Sd/-

**दिनांक २५.०१.२०२२.** **(डी.एम.हिंग्लजकर)**

**ठिकाणः विटा.** **३रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,विटा,**

**ता. खानापूर, जि.सांगली.**

Case No : RCS. No.625 of 2020
I affirm that the contents of this pdf file Order are same words as per original Order,
Name of the Stenographer: S.V.Gaikwad,
Court Name: 3rd Joint Civil & Criminal Court, Vita, Dist.Sangli.
Date of decision : 25.01.2022
Order signed by P.O.on : 25.01.2022
Order uploaded on : 25.01.2022